| MHPU240016502023 | **रे. मु. नं.१५२/२०२३**<br>**बाळासाहेब गुणाजी वाळुंज**<br>विरुद्ध<br>**गुणाजी वाळुंज व इतर** |
|---|---|

## रे.मु.नं.१५२/२०२३ मधील निशाणी क्र.२३ व २५ खालील संयुक्त आदेश

वादी यांनी प्रस्तूतचे अर्ज प्रतिवादी क्र.१,२,४ ते ८ विरूद्ध झालेला एकतर्फा आदेश रद्द होवून कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ होवून कैफियत अभिलेखावर दाखल करुन घेण्यासाठी दाखल केलेले आहेत.

२. अर्जातील वादी यांचे कथनानुसार, प्रतिवादींना दाव्याचे समन्स मिळाल्यानंतर प्रतिवादी यांना न्यायालयात हजर राहणे क्रमप्राप्त होते. परंतु प्रतिवादी यांच्यामध्ये आपसात वाटपासंदर्भात वाद चालु आहे. ते वाद वादी व प्रतिवादी यांनी आपसात मिटावे म्हणुन गावातील प्रतिष्ठीत लोकांकडुन तडजोडीसाठी प्रयत्न केले व करीत आहेत. वादी यांनी दावामिळकतीमधील स्वत:चा अविभक्त हिस्सा वाटप करून मागण्यासाठी दावा दाखल केला असल्याने प्रतिवादीमध्ये गैरसमज निर्माण झालेले आहे. त्यानंतर वादी व प्रतिवादी यांच्या नातेवाईकांनी आपसात वाटप व्हावे म्हणुन प्रयत्न केले. योग्य त्या कारणांचा विचार करता प्रतिवादी यांना मुदतीत दाव्याची कैफियत देता आली नाही. त्यामुळे प्रतिवादींविरूद्ध एकतर्फा आदेश दि.२५.०१.२०२४ रोजी झालेला आहे. प्रतिवादी यांनी यासोबत दाव्याची कैफियत हजर केलेली असुन त्यासाठी त्यांचेविरूद्ध झालेला एकतर्फा सेट असाईड करून त्यास जो विलंब झाला तो माफ होवुन मिळणेसाठी अर्ज दाखल करीत आहे. त्यामुळे प्रतिवादींविरुध्द झालेला ‘एकतर्फा आदेश’ आदेश रदद् होवून, त्यांना कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ होवून कैफियत अभिलेखावर घेणे आवश्यक आहे. त्यामुळे प्रतिवादींना कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ केल्यास वादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट, अर्ज नामंजुर झाल्यास प्रतिवादींवर अन्याय होणार आहे. सबब, नैसर्गिक न्यायतत्वानुसार अर्ज मंजुर करण्यात यावा अशी विनंती केलेली

आहे.

३. प्रस्तूतच्या अर्जावर वादी यांनी त्यांचे म्हणणे दाखल करून अर्जास विरोध दर्शविला. त्यांच्या म्हणण्यानुसार प्रतिवादी यांना कैफियत देण्यास विलंब झाला असून अर्जासोबत कैफियत दाखल केलेली नाही. त्यामुळे सदरच्या अर्जावर योग्य ते न्यायाचे हुकूम व्हावे अशी विनंती केली.

४. अर्ज व म्हणणे वाचले. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला. संपूर्ण दाव्याचे अवलोकन केले असता, वादीने दावामिळकतीचे सरस निरस मानाने वाटप होवून मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्र.१,२,४ ते ८ यांची कैफियत दाव्याच्या कामी सामील करून न घेतल्यास दाव्यातील गुंतागुंत निश्चितच वाढणार आहे व दावा सर्व बाजूंचा न्यायीक विचार करून निर्गत करणे अडचणीचे होणार आहे. सदर अर्जांतील कथनाचे सत्यतेसाठी प्रतिवादी क्र.७ यांनी नि. क्र.२४ व २६ नुसार त्यांचे प्रतिज्ञापत्र दाखल केलेले आहे. याउलट, प्रतिवादी यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी दिल्यास दाव्यातील वादाचे निश्चित स्वरूप न्यायालयासमोर येवून दाव्यातील वाद निर्गत करण्यास मदत होणार आहे. तसेच वादींनी देखील प्रस्तुतचे प्रतिवादींचे अर्जावर म्हणणे दाखल करून स्पष्ट हरकत घेतल्याचे दिसून येत नाही. शिवाय प्रस्तुत दावा हा वादीने दावामिळकतीचे सरस निरस मानाने वाटप होवुन मिळण्यासाठी दाखल केला असल्याने प्रतिवादी यांना आपली बाजू मांडण्याची संधी देणेस नैसर्गिक न्यायतत्वानुसार गरजेचे असल्याने प्रतिवादी क्र.१,२,४ ते ८ यांचे प्रस्तुतचे अर्ज मंजूर करणे आवश्यक आहे. सबब, प्रतिवादी क्र.१,२,४ व ८ याचेविरूद्ध झालेला एकतर्फा आदेश योग्य तो दंड आकारून मंजुर करणे न्यायोचीत होईल. सबब, खालील प्रमाणे आदेश पारीत करणेत येतो.

**—: <u>आदेश</u> :—**

१. प्रतिवादी क्र.१,२,४ ते ८ यांचे प्रस्तुत अर्ज नि.२३ व २५ मंजूर करण्यात येतात.

२. प्रतिवादी क्र.१,२,४ ते ८ यांचे विरुध्द झालेला ‘एकतर्फा आदेश’

रक्कम रू.८००/— (एकूण रक्कम रुपये आठशे) इतका खर्च वादीला देण्याच्या अटीवर रदद् करण्यात येतो. प्रतिवादी क्र.१,२,४ ते ८ यांनी दिलेली कैफियत, आदेशित खर्चाची रक्कम जमा केल्यानंतर दाव्याच्या कामी दाखल करण्यात यावी.

MEGHA SHASHIKANT MALI

Digitally signed by MEGHA SHASHIKANT MALI
Date: 2025.04.21 13:27:06 +0530

ठिकाण: घोडेगाव
दिनांक : ०३.०४.२०२५

**(एम. एस. माळी)**
सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
घोडेगाव